नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - १९३ | Issue - 193 | वार बुधवार दि. ३ डिसेंबर २०२५ | Blow- Wednesday Date 3 December 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# सर्व नगरपरिषदा व नगरपंचायत निवडणुकांची मतमोजणी २१ डिसेंबरला

## मतदानोत्तर चाचण्यांच्या निष्कर्षांना २० डिसेंबरपर्यंत बंदी; राज्य निवडणूक आयोगाचे आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई (रानिआ): राज्यातील सर्व २८८ नगरपरिषदा व नगरपंचायतींची मतमोजणी २१ डिसेंबर २०२५ रोजी करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे. त्याचबरोबर मतदानोत्तर चाचण्यांचे निष्कर्षही २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान समाप्तीच्या अर्ध्या तासापर्यंत जाहीर करता येणार नाहीत, असेही न्यायालयाच्या आदेशात नमूद केले आहे. न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगानेही संबंधित सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत.

मतदान यंत्रांची हातळणी काळजीपूर्वक करण्यात यावी. मतदान यंत्र ठेवण्यात आलेल्या गोदामांसाठी २४ तास चोख सुरक्षा व्यवस्था तैनात करावी. सुरक्षा उपकरणे (उदा. गोदामाच्या प्रवेद्वाराबाहेरील सीसीटीव्ही, सुरक्षा आलार्म सिस्टीम, अग्निशमन यंत्रणा इ.) व्यवस्थित कार्यान्वित असल्याची खात्री करून घ्यावी. राजकीय पक्षांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींना गोदामांबाबत आणि तिथल्या सुरक्षा व्यवस्थेबाबत अवगत करावे. त्याचबरोबर निवडणूक लढविणारे उमेदवार अथवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींना गोदामाचे द्वार दिसेल अशा ठिकाणी बसण्यासाठी जागा निश्चित करून द्यावी, असेही निर्देश राज्य निवडणूक आयोगाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे.

राज्यातील २६४ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आज मतदान झाले; तसेच सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार २४ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या अध्यक्षपदांसह सर्व सदस्यपदांसाठी आणि ७६ नगरपरिषदा व नगरपंचायतींमधील १५४ सदस्यपदांच्या जागांसाठी २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार आहे. या सर्व ठिकाणी आता २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजेपासून मतमोजणी सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## कुंभमेळ्याचे पावित्र्य टिकवून विकासासोबत वारशाचेही जतन करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : दक्षिण गंगा असलेल्या गोदावरीच्या स्वच्छतेसाठी नागरिक आणि गुंतवणूकदारांनी दिलेला उत्स्फूर्त सहभाग अत्यंत कौतुकास्पद आहे. 'विकास भी, विरासत भी' हा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा संदेश मार्गदर्शक असून कुंभमेळ्याचे पावित्र्य टिकवून विकासासोबत ऐतिहासिक वारशाचेही जतन करण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.




नॅशनल स्टॉक एक्सचेंज, मुंबई येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते नाशिक महापालिकेचा 'क्लीन गोदावरी बॉण्ड' समारंभपूर्वक सूचीबद्ध करण्यात आला. या कार्यक्रमास मुख्य सचिव राजेश अग्रवाल, नगरविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. के.एच. गोविंदराज, नॅशनल स्टॉक एक्सचेंजचे व्यवस्थापकीय संचालक आशिष चौहान, 'मित्रा' चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, नाशिक महानगरपालिका आयुक्त मनिषा खत्री उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नाशिक परिसरात कुंभमेळ्यासाठी विविध विकासकामे होत आहेत. राज्य शासनाने नगरविकास विभागामार्फत कुंभमेळ्यापूर्वी आवश्यक असलेली अनेक पायाभूत कामे हाती घेतली आहेत. कुंभमेळ्याचे पावित्र्य कायम राखत विकास पुढे नेला जाईल. यासाठी अनेक योजना तयार केल्या असून त्या कार्यान्वित करण्यात येत आहेत. हे करताना, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे नाविन्यपूर्ण विचार आणि वित्तीय संकल्पनेतूनच योजना पुढे जातील.

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकच्या पायाभूत सुविधांच्या विकासात नाशिक महानगरपालिका महत्त्वाची भूमिका बजावत आहे. नाशिक परिसरात मोठ्या प्रमाणावर विकासकामांची संधी उपलब्ध होत असून, ऐतिहासिक वारसा जपतानाच जीवनदायीनी गोदावरीच्या स्वच्छतेसाठी महत्त्वपूर्ण काम होत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

नाशिक महानगरपालिकेला खुल्या बाजारातील गुंतवणूकदारांचा प्रचंड प्रतिसाद

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, यापूर्वी पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांनीही खुल्या वित्तीय बाजारातून बॉण्डद्वारे निधी उभारला आहे. नाशिक महानगरपालिकेच्या 'क्लीन गोदावरी बॉण्ड'ला गुंतवणूकदारांकडून सबस्क्रिप्शनसाठी मिळालेला चौपट प्रतिसाद ही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आर्थिक सक्षमता, रेटिंग आणि पारदर्शक प्रक्रियेची पावती आहे. राज्यातील १५ महानगरपालिका अशा क्षमतेच्या असून नियमन प्रक्रियेतून विशिष्ट पात्रता आणि नियामक मान्यता पूर्ण करून या महानगरपालिकाही विकासासाठी निधी उभारू शकतात.

खुल्या बाजारातून उभारलेल्या निधीच्या आधारे केंद्र सरकारकडून पायाभूत विकासासाठी मिळणाऱ्या निधीचा मार्गही सुलभ झाला आहे.

तसेच 'एनएसई' प्रक्रियेमुळे २६ कोटी रुपये प्रोत्साहन निधी मिळणार असून याद्वारे महानगरपालिकेवरील व्याजभार शून्य टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकतो, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की,ऊर्जा क्षेत्रातील महत्त्वाच्या कंपन्यांच्या क्षमतेस चालना देण्यासाठी नॅशनल स्टॉक एक्सचेंजच्या माध्यमातून व्यापक प्रमाणात निधी उपलब्ध होईल. पहिल्या टप्प्यात महापारेषण (एमएसईटीसीएल), त्यानंतर महावितरण आणि महानिर्मिती या देशातील मोठ्या वीज कंपन्या सूचीबद्ध करण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल. या प्रक्रियेसाठी नॅशनल स्टॉक एक्सचेंजच्या अनुभवाची मोठी मदत ठरेलअसेही त्यांनी स्पष्ट केले.

## नगरपालिका निवडणुकांची मतमोजणी २१ डिसेंबरला होणार, राज्य सरकार सुप्रीम कोर्टात जाणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील सर्व २८८ नगरपरिषदा व नगरपंचायतींची मतमोजणी २१ डिसेंबर २०२५ रोजी करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे. यावर वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. नगरपालिकेच्या निकालाबाबत वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांचे मोठं वक्तव्य केलं आहे. २१ तारखेच्या निकाला विरोधात राज्य सरकार सुप्रीम कोर्टात जाण्याची शक्यता असल्याचे मुश्रीफ म्हणाले. त्यामुळे निकालाची तारीख आधी सुद्धा येऊ शकेल. पण आता तरी २१ डिसेंबर ही निकालाची तारीख असल्याचे मुश्रीफ म्हणाले.

२१ डिसेंबर ही निकालाची तारीख दिली आहे. मात्र, निकालाची तारीख आधी सुद्धा येऊ शकेल. तोपर्यंत कार्यकर्त्यांनी पर्यटन करून यावे असे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले. ११ वर्षाच्या संघर्षानं दोन गट एकत्र आले आहेत. काही जणांची पूर्वी नाराजी होती. पण ती नाराजी आता दूर झाली आहे. या निवडणुकीमुळं आमच्या दोघांचीही प्रतिष्ठा पणाला लागली होती. त्यामुळं कार्यकर्त्यांनी हाडाची काड करुन निवडणुकीत काम केलं आहे. सर्वच ठिकाणी निवडणूक सुरळीतपणे पार पडली. कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे कष्ट घेतल्याचे मुश्रीफ म्हणाले.

कोल्हापूर, नगरपालिका निवडणुकीची मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कागलमध्ये उमेदवारांकडून जल्लोष करण्यात आला. मंत्री हसन मुश्रीफ आणि शाहू ग्रुपचे अध्यक्ष समरजितसिंह घाटगे हे नेते खर्डेकर चौकात एकत्र आले. दोन्ही नेत्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केलं. दरम्यान कार्यकर्ते फटाक्यांची अतिशबाजी आणि गुलालाची उधळण करत जल्लोष करताना पाहायला मिळाले. मंत्री हसन मुश्रीफ यांनी उमेदवारांना निकाल येईपर्यंत पर्यटन करुन यावं असा सल्ला दिला आहे. तर समरजितसिंह घाटगे यांनी विजय आपलाच होईल असा विश्वास व्यक्त केला आहे.

मुश्रीफ आणि घाटगे या युतीमुळं कागलच्या राजकारणात एक नवा ट्विस्ट निर्माण झालेला. दोन्ही नेत्यांची युती झाल्यापासून कागलमध्ये राजकीय शांतता पाहायला मिळाली. आजच्या मतदान प्रक्रियेतही काही अपवाद वागळता मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडली. त्यामुळे कागलमधील आजच्या मतदान प्रक्रियेच वातावरण हे पूर्णपणे वेगळं होतं. दोन्ही नेत्यांनी निकालाची वाट पाहू असं म्हणत कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण केला.

## गँग ऑफ ट्रिपल इंजिनचे सत्तेसाठी भांडण; हर्षवर्धन सपकाळांकडून महायुती सरकारची खिल्ली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : 'नगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपने 'पैसा फेक तमाशा देख' हे वगनाट्य खेळले आहे. 'गँग ऑफ ट्रिपल इंजिन सरकार' सत्तेसाठी एकमेकांशी भांडत आहे,' अशा शब्दांत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मंगळवारी महायुती सरकारची खिल्ली उडवली.

'निवडणूक आयोग मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या इशाऱ्यावर काम करीत असल्याने मुक्त वातावरणात निवडणूक झाली नाही,' अशी टीका त्यांनी पत्रकारांशी बोलताना केली. 'भाजप पैसे खाऊन गब्बर झाला आहे. गाव तिथे बारा भानगडी असा गोंधळ सत्तेतील तीन पक्षांनी घातली आहे. निवडणूक आचारसंहितेची पायमल्ली केली आहे. सत्ताधारी आमदारांना मस्ती आली आहे. त्यांना गुन्हा म्हणजे पदक वाटू लागले आहे. निवडणूक आयोग नशेत असल्याप्रमाणे काम करीत आहे. हा आयोग सरकारच्या हातातील बाहुले झाला आहे. काही ठिकाणचे मतदान आणि नगरपालिका निवडणुकीची मतमोजणी पुढे ढकलावी लागल्याने आयोगाचे वाभाडे निघाले आहेत. मुक्त वातावरणात निवडणूक घेण्याचे मूलभूत कर्तव्य बजावण्यात आयोग कमी पडला आहे,' अशी टीका सपकाळ यांनी केली.

'काँग्रेसमुक्त भारताची घोषणा देणारा भाजप आता काँग्रेसयुक्त झाला आहे. नेते सोडून गेल्याने काँग्रेस संपणार नाही. देशाचा आणि काँग्रेसचा डीएनए एक आहे. १६५ ठिकाणी नगराध्यक्षपदासाठी काँग्रेस निवडणूक लढवत आहे,' असे त्यांनी सांगितले.

### राज्यात त्रिस्तरीय समग्र कर्करोग उपचार सेवा होणार उपलब्ध

### शिखर संस्था म्हणून टाटा स्मारक रूग्णालय काम पाहणार

## राज्यातील जनतेस सर्वसमावेशक कर्करोग सेवा उपलब्ध होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : कर्करोगाचे वाढते प्रमाण व कर्करोग उपचाराचे गांभीर्य विचारात घेता राज्यातील जनतेस सर्वसमावेशक कर्करोग सेवा राज्य शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. केंद्र सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने दिलेल्या सूचनेनुसार 'आसाम कॅन्सर केअर मॉडेलच्या' धर्तीवर राज्यात त्रिस्तरीय समग्र कर्करोग उपचार सेवा एल १, एल २, एल ३ उपलब्ध होणार आहेत. एल १ या स्तरामध्ये टाटा स्मारक रूग्णालय ही कर्करोगाकरिता शिखर संस्था म्हणून काम करणार आहे. एल २, एल ३ या स्तरावर असणाऱ्या या रूग्णालयात कर्करोगासंबधित प्रशिक्षण मनुष्यबळ निर्माण करणे तसेच या आजाराविषयी संशोधन कार्यात प्रगती करण्यात येणार आहे. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाने याबाबत धोरण निश्चित केले आहे. जिल्हास्तरावर सुरू होणाऱ्या उपचारामुळे अनेक कर्करोगग्रस्त रूग्ण व त्यांच्या नातेवाईकांचा वेळ वाचणार असून स्थानिक जिल्ह्यातच आरोग्य सुविधा उपलब्ध होणार असल्याने या रूग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे.

**राज्यात त्रिस्तरीय समग्र कर्करोग उपचार सेवा (एल १,एल २,एल ३) रुग्णालये**

राज्यात त्रिस्तरीय समग्र कर्करोग उपचार सेवा उपलब्ध होणार आहेत. ङ१ मध्ये टाटा स्मारक रूग्णालय ही कर्करोगाकरिता शिखर संस्था म्हणून काम करणार आहे. एल २ या स्तरावरती कायमस्वरूपी संपूर्ण कर्करोग शिक्षण व सेवा असेल यामध्ये छत्रपती संभाजीनगर, चंद्रपूर, नागपूर, मुंबई (जे.जे.), कोल्हापूर, पुणे (बैरामजी जिजीभॉय शासकीय महाविद्यालय), नांदेड येथील सात शासकीय महाविद्यालयांशी संलग्नित रूग्णालये, नाशिक व अमरावती येथील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील दोन संदर्भ सेवा रूग्णालयांचा यामध्ये समावेश आहे. अशी नऊ केंद्रे एल २ मध्ये समाविष्ट आहेत. एल ३ यास्तरामध्ये मध्ये कर्करोग निदान आणि डे-केअर रेडिओथेरिपी व किमोथेरिपी युनिटस यामध्ये कार्यरत असणार आहेत. अंबाजोगाई (बीड), यवतमाळ, मुंबई (कामा व आल्ब्लेस रूग्णालय), सातारा, बारामती, जळगाव व रत्नागिरी येथील शासकीय महाविद्यालयांशी संलग्नित सात रूग्णालये, ठाणे जिल्हा रूग्णालय संलग्नित व शिर्डी संस्थानचे रूग्णालय अशी एकूण नऊ केंद्रे एल ३ म्हणून कार्यरत होतील. एल २ स्तरामध्ये व एल ३ स्तरामध्ये एकूण १८ रूग्णालये कार्यरत असतील. एल ३ स्तरावरील कर्करोग रूग्णालयांचे बांधकाम शासनामार्फत होऊन ही रूग्णालये सार्वजनिक खासगी भागीदारी तत्वावर उभारण्यात येतील मात्र, या रूग्णालयावर शासनाचे सर्व नियंत्रण असेल.

**मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली महाकेअर फाउंडेशनची स्थापना**

एल २ व एल ३ स्तरावरील आरोग्य संस्थांना आवश्यकतेनुत्तार मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे, संस्थांचे व्यवस्थापन करणे, पीपीपी धोरण राबविणे तसेच इतर अनुषंगिक बाबी पार पाडणे इ. बाबींकरिता मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली कंपनी कायदा, २०१३ मधील सेक्शन-८ अंतर्गत महाराष्ट्र कॅन्सर केअर, रिसर्च अँड एज्युकेशन फांउडेशन महाकेअर फांउडेशन (चकऊठए ऋेीपवरींळेप) ही कंपनी स्थापन करण्यात येणार आहे. आवश्यकतेनुसार संबंधित जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांना निमंत्रित सदस्य म्हणून समाविष्ट करण्यात येईल. त्रिस्तरीय कर्करोग सेवा देणाऱ्या या संस्थाच्या योग्य समन्वयासाठी सिंगल क्लाऊड कमांड आणि कंट्रोल असेल. एल २ स्तर रुग्णालयामध्ये कर्करोगासंबधी पदव्युत्तर व अतिविशेषोपचार शिक्षण एमडी, एएस, डीएम, एमसीएच, डीएनबी फेलोशिप उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे. रुग्णसंख्या व शैक्षणिक बाबी यांसाठी भविष्यातील मागणी विचारात घेता एल २ स्तरावरील संस्थांचे रूपांतर एल १ संस्थेत करणे तसेच भविष्यात या संस्थांच्या संख्येत वाढ देखील करण्यात येणार आहे.

**महाकेअर फाऊंडेशनला विविध माध्यमातून होणार उपलब्ध निधी**

महाकेअर फाऊंडेशनला दैनंदिन भागभांडवल म्हणून सुरुवातीला १०० कोटी रूपये इतका निधी 'कॉर्पस फंड' म्हणून राज्य शासनामार्फत महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतर्गत दुर्धर आजारासाठी उभारण्यात येणाऱ्या २० टक्के राखीव निधीतून उपलब्ध करून देण्यात येईल.

तसेच महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत कर्करोग रुग्णालयास प्राप्त होणाऱ्या शुल्कापैकी २० टक्के शुल्क महाकेअर फाऊंडेशनला देण्यात येईल. या फाऊंडेशनला क्लिनिकल ट्रायल्स मधून निधीची उभारणी करता येईल, आशियाई विकास बैंक, जपान इंटरनॅशनल को ऑपरेशन एजन्सी, जागतिक बैंक तसेच आंतरराष्ट्रीय नाणेनिधी अशा आंतरराष्ट्रीय संस्थांमार्फत तसेच देणग्या, अनुदाने, सीएसआर अंतर्गत देखील निधी शासनाच्या मान्यतेने मिळवता येवू शकेल. आवश्यकता भासल्यास जपान इंटरनॅशनल को ऑपरेशन एजन्सी, आशियाई विकास बँकेमार्फत राज्य शासनात्त प्राप्त होणा-या कर्जातून विहित प्रक्रियेद्वारे निधी उपलब्ध करून घेता येईल.

## संपादकीय....

### कोर्टात जाणार सरकार

राज्यातील सर्व २८८ नगरपरिषदा व नगरपंचायतींची मतमोजणी २१ डिसेंबर २०२५ रोजी करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे. नगरपालिकेच्या निकालाबाबत वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांचे मोठं वक्तव्य केलं आहे. २१ तारखेच्या निकाला विरोधात राज्य सरकार सुप्रीम कोर्टात जाण्याची शक्यता असल्याचे मुश्रीफ म्हणाले. त्यामुळे निकालाची तारीख आधी सुद्धा येऊ शकेल. पण आता तरी २१ डिसेंबर ही निकालाची तारीख असल्याचे मुश्रीफ म्हणाले. २१ डिसेंबर ही निकालाची तारीख दिली आहे. मात्र, निकालाची तारीख आधी सुद्धा येऊ शकेल. तोपर्यंत कार्यकर्त्यांनी पर्यटन करून यावे असे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले. ११ वर्षाच्या संघर्षाने दोन गट एकत्र आले आहेत. काही जणांची पूर्वी नाराजी होती. पण ती नाराजी आता दूर झाली आहे. या निवडणुकीमुळं आमच्या दोघांचीही प्रतिष्ठा पणाला लागली होती. त्यामुळं कार्यकर्त्यांनी हाडाची काड करुन निवडणुकीत काम केलं आहे. सर्वच ठिकाणी निवडणूक सुरळीतपणे पार पडली. कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे कष्ट घेतल्याचे मुश्रीफ म्हणाले. दरम्यान राज्यातील सर्व २८८ नगरपरिषदा व नगरपंचायतींची मतमोजणी २१ डिसेंबर २०२५ रोजी करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे. त्याचबरोबर मतदानोत्तर चाचण्यांचे निष्कर्षही २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान समाप्तीच्या अर्ध्या तासापर्यंत जाहीर करता येणार नाहीत, असेही न्यायालयाच्या आदेशात नमूद केले आहे. न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगानेही संबंधित सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत. मतदान यंत्रांची हातळणी काळजीपूर्वक करण्यात यावी. मतदान यंत्र ठेवण्यात आलेल्या गोदामांसाठी २४ तास चोख सुरक्षा व्यवस्था तैनात करावी. सुरक्षा उपकरणे (उदा. गोदामाच्या प्रवेद्वाराबाहेरील सीसीटीव्ही, सुरक्षा आलार्म सिस्टीम, अग्निशमन यंत्रणा इ.) व्यवस्थित कार्यान्वित असल्याची खात्री करून घ्यावी.

## वर्सोवा मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्रात सहा महिन्यांच्या प्रशिक्षण सत्राचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मत्स्यव्यवसायाचा विकास आणि विस्तार साधण्यासाठी वर्सोवा येथील मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्रात सागरी मत्स्यव्यवसाय, नौकानयन तसेच सागरी डिझेल इंजिन देखभाल व परिचालन या सहा महिन्यांच्या १३५ व्या सत्राचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण १ जानेवारी २०२६ ते ३० जून २०२६ या कालावधीत होत असून पात्र मच्छिमारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

या प्रशिक्षणात मत्स्यव्यवसाय नौकानयनाचे मूलतत्त्व, सागरी डिझेल इंजिनचे भाग, त्यांची दुरुस्ती, मासेमारीची आधुनिक साधने तसेच प्रात्यक्षिक सत्रांचा समावेश आहे. दारिद्रेषेवरील प्रशिक्षणार्थींना प्रतिमहिना ४५० रुपये तर दारिद्रेषेवरील प्रशिक्षणार्थींना प्रतिमहिना १०० रुपये शुल्क आकारले जाणार आहे. या प्रशिक्षणाच्या प्रवेशासाठी प्रशिक्षणार्थी क्रियाशील मच्छिमार व प्रकृतीने सुदृढ असणे आवश्यक असून त्याचे वय १८ ते ३५ वर्षे असावे. प्रशिक्षणार्थींना पोहता येणे बंधनकारक असून तो किमान इयत्ता चौथी उत्तीर्ण असावा. त्याला मासेमारीचा किमान दोन वर्षांचा अनुभव आणि बायोमेट्रिक/आधार कार्ड धारक असावा. त्याचप्रमाणे त्याच्याकडे मच्छिमार संस्थेची शिफारस असलेला परिपूर्ण अर्ज आणि दारिद्र्रेषेवरील असल्यास संबंधित प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे. या प्रशिक्षण सत्राकरिता इच्छुक व पात्र मच्छिमारांनी विहित नमुन्यातील अर्ज संबंधित मच्छिमार सहकारी संस्थेच्या शिफारशीसह मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र, पांडुरंग रामले मार्ग, तेरे गल्ली, वर्सोवा, मुंबई-१९ येथे २२ डिसेंबर २०२५ पर्यंत सादर करावेत.

# नवीन फौजदारी कायद्यांचे प्रदर्शनातील प्रात्याक्षिकाद्वारे ज्ञान..!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





देशात १ जुलै २०२४ पासून भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता व भारतीय पुरावा कायदा हे तीन नवीन कायदे लागू झाले आहेत. या नवीन फौजदारी कायद्यांच्या पार्श्वभूमीवर, नागरिकांना गुन्हा घडल्यापासून अंतिम शिक्षा होईपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया समजावी, यासाठी आयोजित करण्यात आलेल्या प्रदर्शनात प्रात्यक्षिक विशेष आकर्षण ठरले. या प्रात्यक्षिक प्रदर्शनाने गुन्हा नोंदणीपासून शिक्षा आणि पुनर्वसनापर्यंतचा संपूर्ण न्यायप्रक्रियेचा प्रवास अत्यंत स्पष्ट, जिवंत आणि लोकशिक्षणात्मक स्वरूपात मांडला आहे. नवीन फौजदारी कायद्यांमुळे वैज्ञानिक तपास, तत्काळ प्रतिसाद, डिजिटल पुरावे, कठोर शिक्षा आणि पीडित केंद्रित न्याय या तत्त्वांना प्राधान्य मिळाले आहे. हे प्रदर्शन जनजागृतीचा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरले आहे. प्रदर्शनात २५ ते ३० हजार नागरिकांनी भेट देऊन या कायद्यांसंदर्भातील ज्ञान अवगत केले.

भारताच्या न्यायप्रशासनात ऐतिहासिक बदल घडवणाऱ्या नवीन फौजदारी कायद्यांवर आधारित प्रात्यक्षिक प्रदर्शनाने नागरिक, विधिविद्यार्थी, पोलीस अधिकारी तसेच न्यायव्यवस्थेतील विविध घटकांना नव्या कायद्यांचा प्रत्यक्ष अनुभव देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. न्यायसंस्थेच्या सर्व स्तरांवर पारदर्शकता, गतीमानता आणि नागरिकाभिमुखता वाढवण्याच्या दृष्टीने तयार करण्यात आलेल्या या नव्या कायद्यांचे तत्त्वज्ञान, अंगभूत प्रक्रिया आणि त्यांचा प्रत्यक्ष वापर या प्रदर्शनामधून प्रभावीपणे उलगडण्यात आला.

**नियंत्रण कक्षातूनच पिडीतेला न्यायाची हमी**

नव्या कायद्यानुसार गुन्ह्याची नोंद करण्याची प्रक्रिया आणखी सोपी, डिजिटल आणि सर्वांसाठी उपलब्ध झाली आहे. प्रदर्शनात तयार केलेल्या नियंत्रण कक्षाच्या प्रतिकृतीमध्ये, नागरिकांकडून तक्रार स्वीकारणे, ऑनलाईन एफआयआर दाखल करणे, तक्रारदारास त्वरित स्वीकृती देत प्रतिसाद देण्याविषयी प्रात्याक्षिक दाखविण्यात आले. पीडित मुलगी जेव्हा नियंत्रण कक्षाला कॉल करते, त्यावेळी नियंत्रण कक्षाचे कार्य जनतेसमोर येते. पिडीतेला घाबरू नको, आम्ही तुझ्या पाठीशी आहे. हे शब्दच दिलासा देतात आणि न्यायाची हमी मिळवून देतात. नवीन कायद्यांमध्ये पीडितांचे हक्क अधिक मजबूत करण्यावर भर असल्याने तक्रारदाराला तपासाच्या प्रत्येक टप्प्याची माहिती देण्याची सक्ती करण्यात आली आहे. प्रदर्शनातील या विभागात नागरिकांना पीडित हक्क, महिलांसाठी विशेष संरक्षण आणि पोलीस तपासाची गतीने हाललेली सूत्रे दाखविण्यात आली.

**तत्काळ, पारदर्शक आणि जबाबदार तपास**

प्रदर्शनातील पोलीस स्टेशन विभागात पोलिसांची भूमिकाच नव्या दृष्टीकोनातून मांडण्यात आली. नव्या फौजदारी संहितेनुसार पोलीस तपासाची वेळमर्यादा निश्चित करण्यात आली असून, तपासात अनावश्यक विलंब किंवा अधिकारांचा दुरुपयोग होऊ नये यासाठी कठोर नियम लागू केले आहेत. या विभागात सीसीटीव्हीयुक्त चौकशी कक्ष, महिलांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र सुविधा आणित्वरितपंचनामा करण्याची आधुनिक पद्धत प्रत्यक्ष दाखवण्यात आली. यामुळे तपासाची पारदर्शकता आणि विश्वसनीयता वाढवण्याचा उद्देश स्पष्टपणे नागरिकांसमोर आला.

**न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेत पुराव्यांची अचूकता**

नवीन फौजदारी कायद्यांचे एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे वैज्ञानिक पुराव्यांना प्राधान्य देणे आहे. साक्षी पुराव्यांवरील अवलंबित्व कमी करून न्यायवैज्ञानिक पुरावे अनिवार्य करण्याचा प्रयत्न नव्या कायद्यांतून दिसून येतो. प्रदर्शनात मांडण्यात आलेल्या प्रयोगशाळा विभागात बोटांचे ठसे ओळखण्याची आधुनिक तंत्रज्ञान, रक्त, विष, केस, ऊतकांचे नमुने तपासण्याची प्रक्रिया, डीएनए प्रोफाइलिंग, डिजिटल फॉरेन्सिक मोबाईल, लॅपटॉप, सीसीटीव्ही फुटेज विश्लेषणामध्ये नवीन फौजदार कायद्यांमुळे आलेली गतिशिलता दाखविण्यात आली. सात वर्षकिंवात्यापेक्षाजास्तशिक्षाझालीअसल्यासअशागुन्ह्यांमध्येनवीनकायद्यांनुसार न्याय सहायक प्रयोगशाळेद्वारे पुरावे गोळा करण्याची सक्ती आहे. त्यानुसार मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन्स उपलब्ध करून देण्यात येत आहे. न्यायालयीन प्रक्रियेत विलंब टाळण्यासाठी तपास अधिकाऱ्यांना वैज्ञानिक पुरावे अनिवार्य करण्याबाबत नव्या कायद्यांनी स्पष्ट मार्गदर्शन केले आहे. प्रदर्शनातही हेच अधोरेखित करण्यात आले आहे.

**वैद्यकीय सहाय्य व विष शास्त्र विभागात पीडितांच्या न्यायाची प्रक्रिया वेगात**

गुन्हा घडल्यानंतर पीडितांना वेगाने न्याय मिळवून देण्यासाठी ही न्यायप्रक्रियेची अत्यंत आवश्यक पायरी आहे. नव्या कायद्यांनुसार अत्याचारग्रस्त, जखमी व्यक्ती, लैंगिक अत्याचार पिडीत यांच्या वैद्यकीय तपासणीबाबत अधिक स्पष्ट, संवेदनशील आणि कठोर तरतुदी करण्यात आल्या आहेत. प्रदर्शनातील या विभागात वैद्यकीय तपासणीची नव्या मानकांनुसार प्रक्रिया, अहवालांची कालमर्यादा, डॉक्टरांची जबाबदारी आणि नमुन्यांची शृंखला यांचे उत्कृष्ट स्पष्टीकरण दिले आहे. ऑनलाईन पद्धतीने नमुन्यांचे अहवाल संबंधित पोलीस स्टेशनला पाठविण्यात येत असल्यामुळे न्यायप्रक्रियेत गतीमानता आली असल्याचा सकारात्मक बदल प्रदर्शनातून दिसून येत आहे.

**अभियोग संचालनालयात तपास ते न्यायालयीन लढाईपर्यंतचा समन्वय**

नवीन कायद्यात अभियोजन विभागाची भूमिका अधिक बलवान करण्यात आली आहे. गुन्ह्याच्या तपासानंतर पोलिसांनी सादर केलेल्या अहवालाचे परीक्षण करण्यासोबतच, न्यायालयीन प्रक्रियेत दोषारोप सिद्ध करण्यासाठी आवश्यक पुराव्यांची शाश्वती तपासणे ही अभियोजनाची महत्त्वाची जबाबदारी असल्याचे दिसून येते. याविभागात आरोपींवर कोणत्या कलमांनुसार गुन्हा दाखल करता येईल. याबाबत मार्गदर्शन, पुराव्यांची मांडणी, साक्षीदार व्यवस्थापन, पीडितांचे प्रतिनिधित्व, न्यायालयीन दस्तऐवजांची तयारी या सर्व गोष्टींचे स्पष्टीकरण नव्या कायद्यांतील तरतुदींद्वारे नागरिकांना समजावून सांगण्यात आले.

**गतीमान न्याय आणि पारदर्शक कार्यपद्धती**

नव्या फौजदारी कायद्यानुसार न्यायालयीन प्रक्रियेतील अनावश्यक विलंब कमी करण्यासाठी अनेक सुधारणा करण्यात आल्या आहेत. दिवाणी न्यायालयात गुन्हेविषयी साक्षीदाराची ऑनलाइन साक्ष देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच व्हिडिओ कॉन्फरन्सिंग, वेळमर्यादा असलेली सुनावणी, पीडितांसाठी स्वतंत्र मार्गदर्शन, डिजिटल चार्जशीट, डिजिटल पुरावे या सर्व बाबींची नवीन फौजदारी कायद्यांच्या अनुषंगाने माहिती देण्यात आली. गुन्हा घडला ते अंतिम शिक्षा या संपूर्ण प्रक्रियेची साखळी नागरिकांना साध्या आणि समजण्यास सोप्या पद्धतीने प्रात्याक्षिकाद्वारे मांडण्यात आली. तारीख पे तारीख टाळण्यासाठी नवीन कायद्यांतील तरतुदींचा उहापोह करण्यात आला.

**नव्या कायद्यांद्वारे आरोपींसाठी योग्य दंड व्यवस्थापन**

प्रदर्शनातील महत्त्वाचा भाग म्हणजे नवीन फौजदारी कायद्यातील कलमानुसार शिक्षेची माहिती होय. दिवाणी न्यायालयाने ठोठाविलेल्या शिक्षेला मा. उच्च न्यायालयात होत असलेली सुनावणी प्रात्याक्षिकाद्वारे दाखवित हुबेहुब न्यायालयातील प्रसंग उभा करण्यात आला. पारंपरिक शिक्षेच्या पद्धतीत काही बदल करून, समाजहित, पुनर्वसन आणि दंडाची प्रभावीता वाढवण्याकडे कायदा अधिक झुकत असल्याचे या विभागातून स्पष्ट केले गेले. कायदे अधिक स्पष्ट, काटेकोर आणि गुन्ह्यांच्या स्वरूपानुसार वर्गीकृत असल्याने तपास, अभियोजन आणि न्यायालयीन निर्णय सुलभ झाले आहेत.

**प्रदर्शनात प्रश्नावलीच्या माध्यमातूनही कायद्याचे ज्ञान**

नवीन फौजदारी कायद्यांवर आधारित हे प्रात्यक्षिक प्रदर्शन केवळ कायद्यांची माहिती देणारे नव्हते, तर भारतातील न्यायव्यवस्थेतील परिवर्तनाची सशक्त झलक होते. गुन्हा नोंदवण्यापासून अंतिम निकालापर्यंतची प्रक्रिया अधिक तांत्रिक, पारदर्शक, जलद आणि नागरिकमैत्री बनवण्याचा उद्देश स्पष्टपणे सर्वांसमोर आला. नव्या कायद्यांची मांडणी, तंत्रज्ञानाचा उपयोग, वैज्ञानिक तपासाला दिलेले प्राधान्य, पीडितांचे हक्क आणि न्यायप्रक्रियेतील गतीमानता या सर्व माध्यमांतून भारताची न्यायव्यवस्था अधिक सक्षम, संवेदनशील आणि आधुनिक होत असल्याचा संदेश या प्रदर्शनाने परिणामकारकपणे दिला. प्रदर्शनामध्ये विविध कलमांच्या माहितीचे पोस्टर्स आकर्षक रंगसंगतीने दाखविण्यात आले आहे. प्रदर्शनात केवळ सादरीकरणच नाही, तर कायद्याविषयी अधिक सखोल माहिती होण्यासाठी १० प्रश्नांची दोन मिनिटे कालावधी असलेली डिजिटल स्वरूपातील प्रश्नावलीच्या स्क्रीन्स ठेवण्यात आहेत. या स्क्रीनवर नागरिक प्रश्नांची उत्तरे देऊन या कायद्यासंबंधित अधिक माहिती जाणून घेत आहेत. तसेच प्रदर्शनाबाबत डिजिटल स्वरूपात प्रतिसाद देण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे कारागृहांमध्ये कैद्याकडून निर्मित वस्तूंचे स्टॉल्सही या ठिकाणी होते.

या प्रदर्शनात नागरिकांना गुन्हा घडणे, त्याची नोंद, तपास, वैज्ञानिक पुरावे, वैद्यकीय सहाय्य, अभियोजन, न्यायालयीन सुनावणी आणि अंतिम निकालापर्यंत न्यायव्यवस्थेची संपूर्ण साखळी नव्या पद्धतीने समजावून सांगण्यात आली. त्यामुळे जुन्या कायद्यातील कलमे आणि नवीन फौजदारी कायद्यांतील कलमांचे ज्ञान सहजरित्या नागरिकांना मिळाले.

**-निलेश तायडे**
**विभागीय संपर्क अधिकारी**

## माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने आयोजित कार्यक्रम

**ज्येष्ठ पत्रकार सम्राट फडणीस यांचे प्रतिपादन**

# कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर काळाची गरज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





मुंबई : माध्यमांशी संवाद साधण्यासाठी काळानुरूप नव्या तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (ख), विविध डिजिटल ॲप्स, 'टेक्स्ट-टू-व्हिडिओ' प्लॅटफॉर्म, चॅट जीपीटीसारखी साधने वापरून प्रसिद्धी साहित्य तयार केल्यास कामाचा वेग आणि गुणवत्ता दोन्ही वाढू शकते, असे ज्येष्ठ पत्रकार सम्राट फडणीस यांनी सांगितले.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार सम्राट फडणीस बोलत होते. यावेळी संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क) गोविंद अहंकारी, सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव अजय भोसले, उपसंचालक (वृत्त) वर्षा आंधळे, तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सम्राट फडणीस म्हणाले, आज अनेक इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये डिजिटल अँकर्सचा वापर वाढला असून त्यामुळे मनुष्यबळाची गरज कमी होते, अचूकता वाढते आणि वेळेची बचत होते. सोशल मीडियावर वाढत्या प्रमाणात दिशाभूल करणारी माहिती पसरत असल्याने पुढील दहा वर्षांत फॅक्ट-चेकिंगची गरज आणखी वाढेल, यासाठी आधुनिक विश्लेषण प्रणाली, डिजिटल ट्रॅकिंग तंत्रज्ञान यांचा विभागाने सक्षमपणे वापर करणे गरजेचे आहे.

**स्वतंत्र प आणि स्वतःचा डेटा-बेस आवश्यक**

माहिती व जनसंपर्क विभागाने आपले स्वतंत्र आधुनिक प विकसित करून त्याद्वारे शासकीय माहिती, प्रसिद्धिपत्रके, धोरणात्मक घोषणा आणि जनजागृती मोहीमा थेट जनतेपर्यंत पोहोचवाव्यात. स्वतःचा डेटा-बेस तयार केला तर माहिती अधिक जलद व अचूक स्वरूपात नागरिकांपर्यंत पोहोचवता येईल, असेही फडणीस यांनी नमूद केले.

**क्रिएटिव्हिटी, प्रॉडक्टिव्हिटी आणि प्रभावी कंटेंट यांचे महत्त्व**

जनतेपर्यंत पोहोचवली जाणारी माहिती प्रभावी, आकर्षक आणि क्रिएटिव्ह असणे अत्यावश्यक आहे. मनोरंजनाच्या स्वरूपात दिली जाणारी माहिती अधिक लक्षवेधी ठरते, त्यामुळे विभागाने माहिती सादरीकरणाचा आधुनिक दृष्टिकोन स्वीकारणे गरजेचे आहे. नवीन तंत्रज्ञानामुळे प्रत्येकाची प्रॉडक्टिव्हिटी चारपट वाढणार असून, डिजिटल साधनांचा वापर हे यासाठी महत्त्वाचे पाऊल ठरेल, असेही फडणीस यांनी सांगितले.

**राज्यांच्या गुंतवणुकीचे उदाहरण**

केरळ, उत्तर प्रदेश, तामिळनाडू यांसारख्या अनेक राज्यांनी शासकीय माध्यमात मोठी गुंतवणूक करून पर्यटन, उद्योग व शासन व्यवस्था यांची प्रभावी प्रसिद्धी केली आहे. महाराष्ट्र हे मूलतः विकसित राज्य असल्याने पर्यटन, उद्योग, संस्कृती आणि शासन प्रगती यांची देशातील इतर राज्यात प्रभावी प्रसिद्धी करण्यावर भर द्यावा, असेही फडणीस यांनी यावेळी सांगितले.

**माहिती व जनसंपर्क विभाग - शासनाचा खरा दुवा**

शासनाचे लोकराज्य मासिक अतिशय माहितीपूर्ण आणि संग्रही आहे. डिजीटल स्वरुपातही माहिती जनतेला मिळेल यासाठी प्रयत्न गरजेचे आहे. शासकीय माहिती जनतेपर्यंत पोहोचवणारा खरा वाहक म्हणून विभागाने आपली वेगळी ओळख निर्माण करावी. सत्यता विश्वसनीयता, पारदर्शकता आणि गतीमानता ही जनसंपर्क विभागाची ओळख बनली पाहिजे, असे फडणीस यांनी सांगितले.

यावेळी उपस्थित अधिकारी यांनी विविध विषायावर फडणीस यांच्याशी चर्चा केली. यावेळी संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क) गोविंद अहंकारी यांनी फडणीस यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. विभागीय संपर्क अधिकारी संध्या गरवारे यांनी सूत्रसंचलन केले तर वरिष्ठ सहायक संचालक काशीबाई थोरात यांनी आभार मानले.

## 'शूटिंग स्टार्स २०२५' सेलिब्रिटी फुटबॉल सामन्याचे ५ डिसेंबर रोजी आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : 'शूटिंग स्टार्स २०२५' हा सेलिब्रिटी फुटबॉल सामना मुंबई येथे ५ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये टायगर श्रॉफ, सिद्धांत चतुर्वेदी यांसारखे अनेक लोकप्रिय कलाकार सहभागी होणार आहेत. हा उपक्रम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सुरु करण्यात आलेल्या प्रोजेक्ट महा-देवच्या अंतर्गत आयोजित केला जात आहे.

प्रोजेक्ट महा- देव हा महाराष्ट्रातील ण-१३ वयोगटासाठीचा पहिलाच असा राज्यस्तरीय उपक्रम आहे, ज्याचा उद्देश भारतीय संघासाठी भविष्याचे उत्तम फुटबॉलपटू तयार करणे हा आहे. २०३४ च्या ऋखऋ विश्वचषकासाठी भारताच्या संघात किमान पाच खेळाडू महाराष्ट्रातून असावेत, हे या उपक्रमाचे ध्येय आहे. या उपक्रमाचे तीन मुख्य आधारस्तंभ आहेत. टॅलेंट आयडेंटिफिकेशन (प्रतिभा शोध): ग्रामीण आणि शहरी भागातील लहान खेळाडूंना शोधून त्यांना संधी देणे. जागतिक दर्जाचे प्रशिक्षणः वैज्ञानिक कोचिंग, फिटनेस, मानसिक आधार, तांत्रिक प्रशिक्षण अशा सर्व सुविधा देणे. दीर्घकालीन खेळाडू विकासः शिक्षण, पोषण, मार्गदर्शन, आणि निवासी प्रशिक्षणाच्या मदतीने मुलांचा सर्वांगीण विकास करणे. हा उपक्रम क्रीडा व युवक कल्याण मंत्री ॲड. मणिकराव कोकाटे यांच्या नेतृत्वाखाली, तसेच महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन, वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन आणि व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन फाउंडेशन यांच्या संयुक्त सहकार्याने राबवला जात आहे. या बहुपदरी निवड प्रक्रियेत गावपातळीवरून १०,००० हून अधिक ण-१३ मुले आणि मुलींनी सहभाग घेतला होता. त्यातून १२० खेळाडूंनी राज्यस्तरीय अंतिम फेरीत प्रवेश मिळवला आहे. आता यातील ६० मुलांची पाच वर्षांच्या निवासी शिष्यवृत्तीसाठी निवड होणार आहे. या शिष्यवृत्तीत उच्च दर्जाचे प्रशिक्षण, शिक्षण, पोषण आणि १४ डिसेंबर रोजी लिओनेल मेसी यांच्या खास फुटबॉल क्लिनिकमध्ये सहभागी होण्याची संधी मिळणार आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# उपजिल्हा रुग्णालय निफाड येथे एड्स जनजागृती रॅली

## पथनाट्य, रॅलीद्वारे विविध उपक्रम; मान्यवरांनी केले मार्गदर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
निफाड/प्रतिनिधी

जागतिक एड्स दिनानिमित्त डॉ. राजीव तांभाळे वैद्यकीय अधिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली उपजिल्हा रुग्णालय निफाड व निफाड नर्सिंग विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रॅली व पथनाट्याच्या माध्यमातून एचआयव्ही/एड्सबाबत जनजागृती करण्यात आली.

यावर्षीचा जागतिक एड्स दिन उत्साहात आणि सामाजिक संदेश देत साजरा करण्यात आला.

डॉ निलेश लाड यांनी रॅलीला हिरवा झेंडा दाखवून रॅली ची सुरुवात करण्यात आली. या मध्ये विद्यार्थ्यांनी, आरोग्य कर्मचारी आणि स्वयंसेवी संस्थांनी एड्सला नाही, जागरूकतेला होकार, सुरक्षित रहा - निरोगी रहा अशा घोषणांनी निफाड शहर परिसरात दुमदुमून गेला होता जागतिक एड्स दिनानिमित्त डॉ निलेश लाड यांनी मनोगतात सांगितले की एचआयव्ही/एड्सचा प्रसार, प्रतिबंध, तपासणी, उपचार सुविधा आणि एड्सबाधित व्यक्तींचे हक्क या याबाबत मार्गदर्शन केले

आय सी टी सी विभागातील समुपदेशक नितीन परदेशी यांनी एचआयव्ही/एड्स प्रतिबंधासाठी सुरक्षित लैंगिक व्यवहार, नियमित तपासणी व समुपदेशनाचे महत्त्वही अधोरेखित करण्यात आले. तसेच टोल फ्री नंबर १०९७ व एच आय व्ही एड्स कायदा २०१७ बाबत माहिती दिली दिली असून आय सी टी सी विभागात एचआयव्ही तपासणी मोफत HIV Testing सेवांचा लाभ सर्व विद्यार्थ्यांनी व नागरिकांनी घ्यावा याकरिता अहवान केले.

या कार्यक्रमात निफाड नर्सिंग विद्यालयातील प्राचार्य यांनी एड्सबाधित व्यक्तींप्रती सहानुभूती, समर्थन आणि भेदभावमुक्त समाज निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला.

जागतिक एड्स दिनानिमित्त राबवलेले पथनाट्य या उपक्रमाचे नागरिकांकडून कोतुक करण्यात आले.

सदर प्रसंगी डॉ संकेत आहेर, भाऊसाहेब कोल्हे, फणसे, शिवांजली शैक्षणिक व सामाजिक संस्था संचलित निफाड नर्सिंग स्कूल नाशिक संस्थेचे अध्यक्ष डॉ बाळासाहेब पवार, डॉ भगीरथ जाधव, ज्ञानेश्वर पवार, पुनम सोनवणे व शिक्षक अक्षय साखरे विशाल पारधे आनंद पवार दीपांजली धीवरे अश्विनी परदेशी प्रवीण उगले रिंकू गावित हे उपस्थित होते. सदरील रॅली ही यशस्वीरित्या करण्याकरीता पौर्णिमा कोंडके, प्रयोग




शाळा तंत्रज्ञ, मंगला बोरसे,अधिपरिचारिका, जनार्दन परदेशी, टी बी सुपरवायझर, निकिता तंवर, ऋषिकेश सानप आरोग्य मित्र व इतर कर्मचारी यांनी मेहनत घेतली आहे.

# सावरकर विद्यालय कोठुरे येथे एड्स दिन व गीता जयंती उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
निफाड/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाज संचलित स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालय कोठुरे येथे एड्स जनजागृती दिवस व गीता जयंती साजरी करण्यात आली कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील सातपुते हे होते. व्यासपीठावर ज्येष्ठ शिक्षक शिवाजी सानप सुधाकर निकम संजय निकम उपस्थित होते. गीता धर्मग्रंथाचे पूजन करून कार्यक्रमाचे सुरुवात करण्यात आली .या प्रसंगी विद्यार्थी वैभव मोगल, विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षिका अनिता पवार , सुधाकर निकम यांनी भगवद्गीतेवर आपले मनोगत व्यक्त केले.



आपल्या मनोगत तात विविध दाखल्यांसह जीवनात भगवद्गीतेचे वाचन उत्तर वयात न करता तरुण वयात करावे व त्याचा आदर्श घेऊन आपली जीवन व्यतीत करावे असा बहुमोल सल्ला उपस्थितांना दिला, शिक्षकीय मनोगतात थोरात यांनी विद्यार्थ्यांना एड्स या रोगाचा इतिहास त्याची लक्षणे व त्याबद्दल घ्यावयाची काळजी याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील सातपुते यांनी गीता धर्मग्रंथ व उल्लेख केलेले कर्म,ज्ञान आणि तत्वज्ञान याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच जीवनाच्या प्रवासात मार्गदर्शन करणारा उत्तम ग्रंथ असा पद्धतीने आपले विचार व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदन दिघे व वैभव मोगल यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विज्ञान छंद मंडळ व सांस्कृतिक समिती सदस्यांचे विशेष सहकार्य लाभले.

# पंढरपूर नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रणिती भालके, शामल शिरसाट यांनी बजावला मतदानाचा हक्क





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर नगरपालिका २०२५ नगराध्यक्ष नगरसेवक पदासाठी आज मतदान घेण्यात येत आहे. कोण विजयी होणार याकडे सर्व पंढरपूर वासियांचे लक्ष लागले आहे.

गेल्या दहा दिवसापासून निवडणुकीची रणधुमाळी मोठ्या प्रमाणात चालू होते. आज मंगळवार दिनांक २/ ११/ २०२५ रोजी नगराध्यक्ष व ३५ नगरसेवकांचे मतदान प्रक्रिया सुरू असताना सकाळी साडेसात वाजता मतदान सुरू असताना सकाळी गर्दी कमी होती. साडे सात ते साडेपाच पर्यंत पंढरपूर नगरपालिका नगरांची पदाच्या उमेदवारा डॉ. प्रणिती भालके यांनी मतदान केंद्रावर जाऊन मतदान केले. भाजपचा उमेदवार श्यामल शिरसाठ यांनी मतदान केले. दोन्ही उमेदवारांनी विजयाचा दावा केला आहे. यामध्ये कोण विजयी होणार हे पंढरपूर शहरातील लोकांची लक्ष लागले आहे.

# लष्कर भागात बसथांबा हलविण्याचा डॉ. आडकेंचा प्रयत्न; नागरिकांचा तीव्र विरोध




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
सोलापूर/प्रतिनिधी : भुईकोट । लष्कर भागातील बेडरपूल परिसरातील मुनशी बंगला येथे अनेक वर्षांपासून असलेला बसथांबा केवळ हॉस्पिटलच्या दर्शनी भागाला अडथळा ठरत असल्याच्या कारणावरून हलविण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी नागरिकांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे. डॉ. आडके यांच्या हॉस्पिटललगत असलेला हा बसथांबा दुसरीकडे हलवण्यासाठी महापालिकेला दिशाभूल करून खाजगी पातळीवर हालचाली सुरू झाल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. या बसथांब्याबाबत नागरिकांनी महापालिका प्रशासन, संबंधित विभाग आणि आयुक्तांकडे लेखी आक्षेप नोंदवत बसथांबा मूळ ठिकाणीच कायम ठेवावा अशी मागणी केली आहे.

परिसरातील रहिवासी, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी व महिलांचा दैनंदिन प्रवास या बसथांब्यावर अवलंबून असून, कोणताही वाहतूक अभ्यास किंवा जनमत न घेता बसथांबा हलविण्याचा प्रयत्न हा जनतेच्या सोयीवर घाला असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. महापालिकेच्या निष्क्रिय भूमिकेमुळे हा बसथांबा हलविण्यासाठी दबाव टाकला जात असल्याचीही भावना व्यक्त होत आहे. हा बसथांबा सार्वजनिक सोयीसाठी दशकांपासून कार्यरत आहे. वैयक्तिक कारणांवरून त्याचे स्थलांतर स्वीकारार्ह नाही, असा ठाम सूर परिसरात पाहायला मिळत आहे. नागरिकांनी दिलेल्या निवेदनात बसथांबा हलविण्याच्या हालचाली तात्काळ थांबवून, तो मूळ ठिकाणीच कायम ठेवावा, तसेच कोणत्याही खाजगी व्यक्तीला लोकसुविधांमध्ये हस्तक्षेप करण्यास परवानगी देऊ नये, अशी मागणी करण्यात आली आहे .

# तांबरवाडी येथील श्री गुरु लालगीर महाराज मठात एकादशीनिमीत्त हरिपाठ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
औसा प्रतिनिधी/अमर जाधव : आज औसा तालुक्यातील तांबरवाडी येथील ग्रामदैवत लालगीर महाराज मठामध्ये लालगीर महाराज महीला भजनी मंडळाच्या वतिने एकादशी महोत्सव साजरा करण्यात आला या , एकादशी सोहळ्याला प्रमुख पाहुणे मनुन गावातील रागिणी अरविंद पाटील, वर्षाराणी संजय लोंढे, बबिता दयानंद अनसरवाडे ,ज्योती श्रीराम बोडके ,व सावित्रा गंगाधर भोकरे यांना आरतीसाठी मान देउन वरील महिलांच्या शुभहस्ते आरती करण्यात आली. यावेळी परम पुज्य लालगीर महाराज महिला भजनी मंडळाच्या वतीने प्रमुख पाहुणे मनुन आलेल्या महिलांना शाल श्रीफळ देउन सत्कार करण्यात आला.




आज तांबरवाडी येथील ग्रामदैवत लालगीर महाराज मठामध्ये मार्गशीष एकादशी सोहळा साजरा करण्यात आला ,तांबरवाडी येथील परम पुज्य लालगिर महाराज महिला मंडळाच्या वतिने एकादशी सोहळा आयौजीत करण्यात आला होता या एकादशी महोत्सवामध्ये तांबरवाडी गावातील ग्रामदैवत लालगिर महाराज मठामध्ये लालगिर महाराज मुर्ती व विठ्ठल रुक्मिनी यांच्या प्रतिमेच पुजन करुन हरिपाठ व भजन ,अभंग गाउन महिलांनी पाउल खेळत एकादशी साजरी केली , यावेळी

अध्यक्ष छायाबाई बिराजदार, उपाध्यक्ष मंगलबाई बोडके, सचिव नंदाबाई बाजुळगे, मंगलबाई सोमवंसे, करुना बिराजदार, जानकाबाई बिराजदार, सुमनाबाई बोडके, धोंडाबाई सुर्यवंशी, वनीता शिंदे, अनिता धुमाळ, सविता धुमाळ, कमलाबाई जाधव, ललाबाई बिराजदार, उषा भोकरे, रुतुजा बाजुळगे सह गावातील महिला उपस्थीत होत्या.

# अमरज्योत मित्र मंडळातर्फे श्रीदत्त जयंती उत्सवाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
घाटकोपर,(केतन भोज) ;अमरज्योत मित्र मंडळ सेवानगर यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही दि.०२,०३,०४ डिसेंबर २०२५ रोजी श्रीदत्त जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून,मंगळवार दि.०२ डिसेंबर रोजी रात्री ०९ ते १० या वेळेत ओंकार प्रासादिक सुस्वर भजन मंडळ यांचे प्रसादिक भजन आयोजित करण्यात आले तर बुधवार दि.०३ डिसेंबर रोजी एकांकिका व नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.तर गुरुवार दि.०४ डिसेंबर रोजी श्रीदत्त जयंती उत्सव साजरा करण्यात येणार असून त्यानिमित्त श्री सत्यनारायण महापूजा व महाप्रसाद आणि दत्त प्रासादिक सुस्वर भजन आयोजित करण्यात आले आहे. तरी सर्व भाविक दत्त भक्तांनी सहकुटुंब सहपरिवार यावेळी या श्रीदत्त उत्सवाला उपस्थित राहून श्रीदत्त दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन अमरज्योत मित्र मंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे.




**योग्य मोबदला न मिळाल्यास मोठ्या आंदोलनाचा इशारा**

**विविध प्रकल्पग्रस्त हितकारी कृती समितीची चेतावणी**

# खावडा उच्च दाब विद्युत वाहिनीला भिवंडी तालुक्यातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा तीव्र विरोध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : पालघर जिल्ह्यातील तारापूर ते पडघा विद्युत उपकेंद्र यादरम्यान उभारण्यात येणाऱ्या खावडा उच्च दाब विद्युत वाहिनीसाठी भिवंडी तालुक्यातील वीस गावांतील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र यासाठी समाधानकारक मोबदला न मिळाल्याचा आरोप करत विविध प्रकल्पग्रस्त हितकारी कृती समितीने तीव्र आंदोलनाची चेतावणी दिली आहे.



तालुक्यातील या वीस गावांमधून जाणाऱ्या खावडा टॉवर लाईनमुळे शेकडो हेक्टर शेती जमीन बाधित होत असल्याने शेतकरी संतप्त आहेत. शेतकरी कृती समितीने या प्रकल्पाला सातत्याने विरोध दर्शवला असून शेतकऱ्यांना न्याय्य मोबदला मिळावा, हा त्यांचा प्रमुख आग्रह आहे. गेल्या अनेक दिवसांपासून शेतकरी व कृती समिती प्रशासनाशी सातत्याने पत्रव्यवहार करत आहेत; मात्र अद्याप समाधानकारक उत्तर मिळालेले नाही. उलट खावडा कंपनीकडून वृत्तपत्रांमधून जुने फोटो आणि संदर्भ देत दिशाभूल केल्याचा आरोप समितीने केला आहे.

खावडा कंपनीचा अरेरावी पवित्रा कायम राहिला तर शेतकरी कृती समिती प्रकल्पग्रस्तांसह मोठे आंदोलन उभारणार असल्याचे कृती समितीचे मुख्य समन्वयक राजन गावंड आणि भगवान सांबरे यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली. शेतकरी आणि कृती समितीने वारंवार न्याय मागूनही प्रशासनाकडून दिरंगाई होत असल्याचा आरोप समितीने केला. शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळाला नाही तर शासन-प्रशासनाला तीव्र आंदोलनाला सामोरे जावे लागेल. असा ठाम इशारा प्रकल्पग्रस्त हितकारी कृती समितीने दिला. या परिषदेत मुख्य समन्वयक राजन गावंड, भगवान सांबरे, रघुनाथ पाटील, कुणाल पाटील, शांताराम पाटील, सुरेश राऊत, नारायण पाटील, काशिनाथ शेलार यांसह शेतकरी व कृती समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जागतिक एड्स दिन व मासिक पाळी व्यवस्थापन सत्र मार्गदर्शन शिबिर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
रेणापूर/ प्रतिनीधी, सुधाकर रणदिवे : दि.१/१२/२०२५ रोजी रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन व रेणुका अध्यापक विद्यालय, रेणापूर येथे आदित्य बिर्ला एज्युकेशन ग्रूप मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्स दिन व मासिक पाळी व्यवस्थापन सत्र या मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या वेळी प्रमुख मार्गदर्शक सौ. स्मितल उषा भागवत , (त्रुलळश्रळींरीं) आदित्य बिर्ला एज्युकेशन ग्रूप मुंबई यांची उपस्थिति होती. एड्स व मासिक पाळी व्यवस्थापन सत्र या विषयावर शाळा ,कॉलेज मध्ये जागृती करण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे असे प्रतिपादन यावेळी बोलताना सौ स्मितल उषा भागवत यांनी केले या वेळी रेणूका अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य रतन लहाने, प्र.प्राचार्य उमेश रणदिवे,प्रा. रमाकांत गायकवाड, लेखापाल राधिका माने मॅडम, ग्रंथपाल मनिषा लातूरकर यांची उपस्थिति होती.या वेळी डी. एल एड व बी एड चे सर्व छात्र अध्यापक उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.वैष्णवी सुरवसे यांनी केले तर आभार प्रदर्शन कु. कौमुदिनी लहाने यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अजय बद्दर,अभिषेक जाधव व दत्ता चादरे यांनी सहकार्य केले.



# महापरिनिर्वाण दिनासाठी सुरक्षेसह सेवासुविधांची काटेकोर अंमलबजावणी करा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## इंदू मिल येथील पुतळ्यासंदर्भात समन्वय समिती स्थापन करण्यात येणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई, दि. २: देशभरातून महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी चैत्यभूमी परिसर तसेच मुंबईत लाखोंच्या संख्येने अनुयायी येतात. येणाऱ्या अनुयायांची सुरक्षितता आणि सोयीसुविधांसाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे. चैत्यभूमी येथे उभारल्या जाणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासंदर्भात विविध सूचना प्राप्त झाल्या असून याबाबत समन्वय समिती स्थापन करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाला ज्ञान दिले आणि जागरूक केले. या जागरूकतेला अधिक बळकटी देण्याचा तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार पुढे नेण्याचा प्रयत्न महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने आपण सर्वजण करुया, असेही आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पूर्वतयारीच्या अनुषंगाने मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज सह्याद्री अतिथीगृह येथे आढावा बैठक झाली. या बैठकीस सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ, माजी मंत्री विजय गिरकर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, बेस्ट'च्या महाव्यवस्थापक सोनिया सेठी, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल, तसेच विविध विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे यांच्यासह विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, चैत्यभूमी परिसरात योग्य मंडप व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सोय, तसेच इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. दादर व आसपासच्या परिसरात वाहतूक पोलीस यंत्रणांनी रहदारीचे योग्य नियोजन आणि नियंत्रण करावे. अनुयायांना मार्गदर्शन मिळावे यासाठी जागोजागी सूचनाफलक लावावेत. तसेच, नागरिकांना सुलभ प्रवासासाठी बेस्टतर्फे अतिरिक्त बससेवा उपलब्ध ठेवावी. या बैठकीच्या निमित्ताने अनेक चांगल्या व उपयुक्त सूचना प्राप्त होतात. यामुळे मूलभूत बाबींवर लक्ष देत दरवर्षी अधिक चांगले काम करता येते, तसेच काही उणीवा राहिल्या असतील तर त्या दूर करण्याचा प्रयत्न करता येतो. उत्तम नियोजन आणि समन्वयासाठी ही बैठक आयोजित केली जात असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

बैठकीत येणाऱ्या अनुयायांची व्यवस्था, सुरक्षेची व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, बस सेवा, भोजन व्यवस्था, चैत्यभूमी परिसरात वॉटरप्रूफ मंडप, स्वच्छतागृहे, वाहतूक व्यवस्थेचे नियोजन, पुष्पवृष्टी, सीसीटीव्ही कॅमेरे आणि इतर सर्व सोयीसुविधा यांचा सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त तयार करण्यात आलेल्या पोस्टरचे अनावरण तसेच माहिती पुस्तिकेचे प्रकाशन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

# महाराष्ट्र सदन येथे १२ ते १४ डिसेंबर दरम्यान 'महाराष्ट्र खाद्य महोत्सव'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : महाराष्ट्राच्या खमंग खाद्य पदार्थांचा आस्वाद दिल्लीकरांना मिळावा या उद्देशाने राजधानी दिल्ली येथील महाराष्ट्र सदनात महाराष्ट्र खाद्य महोत्सवाचे आयोजन १२ ते १४ डिसेंबर २०२५ दरम्यान करण्यात आले असल्याची माहिती महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त आणि सचिव आर. विमला यांनी दिली.

कस्तुरबा मार्गांवरील महाराष्ट्र सदनात आयोजित या महोत्सवात महाराष्ट्राच्या विविध प्रादेशिक खाद्यसंस्कृतीचा आणि कलेचा संगम पाहायला मिळणार आहे. चवदार पदार्थांची रेलचेल दिल्लीकरांना या

**दिल्लीकर खवय्यांसाठी मराठमोळी मेजवानी**

निमित्ताने अनुभवायला मिळणार आहे.

**प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांच्या हस्ते उद्घाटन; पाककृतींची मेजवानी**

या खाद्य महोत्सवाचे उद्घाटन महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय शेफ विष्णू मनोहर यांच्या हस्ते होणार आहे. खाद्य महोत्सवामध्ये महाराष्ट्रातील विविध भागांतील वैशिष्ट्यपूर्ण पदार्थ उपलब्ध असतील. नागपूर विभागातील सावजी चिकन, मटण रस्सा, तर्री पोहा आणि संत्री-आधारित मिठाई; पुणे भागातील मिसळ-पाव, वडा पाव आणि पुरणपोळी, जळगावातील शेव भाजी, वांग्याचे भरित आणि केळीशी संबंधित पदार्थ; मालवणातील मालवणी सीफूड, कोंबडी वडे आणि सोलकढी; छत्रपती संभाजी नगरमधील नान कालिया, डालिंबी उसळ आणि स्थानिक बिर्याणी; तसेच कोल्हापुरी नॉन-व्हेजमधील तांबडा रस्सा, पांढरा रस्सा आणि कोल्हापुरी चिकन किंवा मटण यांचा समावेश असेल. हे पदार्थ महाराष्ट्राच्या समृद्ध पाककृती परंपरेचे प्रतिनिधित्व करतील. या खाद्य महोत्सवात सातारा, कोल्हापूर, जळगाव,पुणे अमरावती, रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेतर्गत असलेले महिला स्वयंम सहायता समूह सहभागी होणार असून त्यांच्याकडील रुचकर पदार्थांचा देखील गरमागरम आस्वाद घेता येणार आहे.

**सांस्कृतिक कार्यक्रम आणि बालकांसाठी विशेष आकर्षण**

हा महोत्सव केवळ खाद्यपदार्थांपुरता मर्यादित नसून, महाराष्ट्राची समृद्ध कला आणि संस्कृती दर्शवणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रमही आयोजित करण्यात आले आहेत.लहान मुलांसाठी खास आकर्षण म्हणून 'करमणूकीचे'चे खेळ आणि जादूचे प्रयोग याचे आयोजन करण्यात आले. ज्यामुळे कुटुंबातील सर्व सदस्यांना या महोत्सवाचा आनंद घेता येईल.

**महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ स्टॉलद्वारे पर्यटन स्थळांचे दर्शन**

या महोत्सवात महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचा (एमटीबीसी) विशेष माहिती स्टॉल देखील असणार आहे. या स्टॉलद्वारे महाराष्ट्रातील ऐतिहासिक, धार्मिक आणि नैसर्गिक पर्यटन स्थळांची माहिती देण्यात येईल. पर्यटन स्थळांच्या माहितीपत्रकांचे वितरण करून महाराष्ट्राच्या पर्यटनाला अधिकाधिक चालना देण्याचा मानस असल्याचे निवासी आयुक्त आर. विमला यांनी यावेळी सांगितले.

महाराष्ट्राच्या अस्सल चवीचा संस्कृतीचा, पर्यटनाचा अनुभव घेण्यासाठी दिल्लीतील नागरिकांनी या तीन दिवसीय खाद्य महोत्सवाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन निवासी आयुक्त आर. विमला यांनी केले आहे.

# दिव्यांग अमोलची 'सुवर्ण' भरारी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिली प्रेरणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




नागपूर, : जन्मतःच दोन्ही पायांनी अधू असल्याने आपले पुढे कसे होणार असा प्रश्न त्याला पडायचा पण काय करावे कळत नव्हते, मात्र त्याच अमोलने क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून घेतलेली भरारी इतरांसाठी प्रेरणादायी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या एका भाषणाने आपल्यात जिद्द निर्माण झाली पायांनी अधू असूनही काही भरीव करू शकलो, असा कृतज्ञतापूर्वक उल्लेख अमोल करतो. नागपूर जिल्ह्यातील वलनी या खेड्यातून अमोल शिक्षणासाठी नागपुरात आला. जन्मतःच दोन्ही पाय अधू मात्र वयाच्या दहाव्या वर्षी आयुर्वेदिक औषधांनी एका पायात बऱ्यापैकी जोर आला. पण एक पाय अधू असल्याने त्याला सारे लंगड्या म्हणून बोलवायचे. त्यावेळी त्याला खूप वाईट वाटायचे. त्यामुळे आपणही आयुष्यात काही वेगळे करावे, असे त्याला वाटायचे आणि मुख्यमंत्री फडणवीस यांचे भाषण ऐकल्यानंतर त्याला तो मार्ग सापडला होता. या वर्षी थायलंडमध्ये झालेल्या दिव्यांगांच्या स्पर्धेत अमोलने भारताचे प्रतिनिधित्व केले आणि भारोत्तोलन स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावले. देश विदेशातील स्पर्धांमध्ये त्याने भारोत्तोलन, पंजा कुस्ती अशा विविध क्रीडा प्रकारात पदकांची कमाई केली आहे. त्याच्या एका पायाला कंबरेपासून कॅलिपर लावले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वेळोवेळी दिलेल्या प्रोत्साहनामुळे आज अमोल एक यशस्वी उद्योजक आहे आणि शेकडो तरुणांना त्याने रोजगार दिला आहे. यातून पाचशेच्या वर दिव्यांग आपल्या पायावर उभे झाले आहेत.

दिव्यांग संवाद या उपक्रमाद्वारे दिव्यांगांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्याची धडपड सुरू आहे. नागपुरात जिम सुरू करून दिव्यांग तरुणांना पंजा कुस्तीचे प्रशिक्षण अमोल देत आहे. एखादे सकारात्मक भाषण कसे कायापालट करू शकते, याचे माझे आयुष्य उत्तम उदाहरण असल्याचे त्याने सांगितले.

# महापरिनिर्वाणदिनाच्या पूर्वतयारीचा कोकण विभागीय आयुक्तांनी घेतला आढावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी येथे लाखो अनुयायी अभिवादन करण्यासाठी येत असतात. या अनुयायांना पुरविण्यात येणाऱ्या आवश्यक सोयी-सुविधांच्या पूर्वतयारीचा आढावा कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी घेतला.

कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजयसूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त करावयाच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने आढावा बैठक मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे घेण्यात आली.

बैठकीस मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल, कोकण विभागअपर आयुक्त फरोग मुकादम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे यांच्यासह विविध संघटनांचे प्रतिनिधी तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, महापरिनिर्वाण दिनानिमित्त प्रत्येक विभागाने आपल्याला दिलेली जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडावी. चैत्यभूमी परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये या दृष्टीकोनातून पोलीस बंदोबस्त याबाबत काटेकोर नियोजन करण्यात यावे, असे निर्देश दिले.चैत्यभूमी परिसरातील स्वच्छता, साफ-सफाई याबाबत संबंधित यंत्रणांनी काटेकोरपणे जबाबदारी पार पाडावी असेही निर्देश त्यांनी यावेळी दिले.

# पोलिस मित्र संघटना (शाखा भिवंडी) आयोजित संघटनेचा फलक उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : पोलिस मित्र संघटना (शाखा भिवंडी) आयोजित संघटनेचा फलक उद्घाटन उत्साहात पार पडला. यावेळी संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष संतोष दादा चौधरी, राष्ट्रीय जनसंपर्क प्रमुख गजानन भगत,पोलीस निरीक्षक, वाहतूक (शाखा भिवंडी) ज्ञानेश्वर साबळे, जनकल्याण चॅरीटेबल ट्रस्ट मंगेश यादव, ड नाना अय्यर, युवा उद्योगपती विराज साईनाथ पवार, आर.जे.फाऊंडेशन रितेश जाधव, ड रितेश टावरे, माजी नगरसेविका लक्ष्मी अशोक पाटील, तसेच अखिल पद्मशाली समाज अध्यक्ष रामकृष्ण पोट्टाबतिनी तर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस वंदन करून करण्यात आली व फलकाचे उद्घाटन करण्यात आले.आगमन झालेल्या मान्यवरांचे स्वागत सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आले. यावेळी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.त्यात आरोग्य शिबिर, पोलीस कर्मचाऱ्यांना गणवेश वाटप, तसेच संघटनेतील कार्यकर्त्यांना पदवाटप अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम राष्ट्रीय वाहतूक विभाग अध्यक्ष रुपसिंह राजपुरोहित आणि भिवंडी शहर जिल्हा अध्यक्ष अर्जुन सब्बानी, महिला अध्यक्ष भाग्यश्री शरद उघडे, महासचिव रमा अंकम, आणि सर्व संघटनेचे कार्यकर्ते यांच्या कुशल नेतृत्वाखाली अत्यंत यशस्वीपणे संपन्न झाला. उपस्थित मान्यवरांनी पोलीस मित्र संघटनेच्या उपक्रमांचे कौतुक करत, समाजकार्यातील योगदानाबद्दल संघटनेचे अभिनंदन केले.

**उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या सूचना**

**विभागीय आयुक्त कार्यालयात तातडीची आढावा बैठक**

# नवले ब्रिज दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय महामार्गावर तात्काळ पाच उपाययोजना कराव्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुणे (जिमाका वृत्तसेवा) : मुंबई-बेंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील नवले ब्रिज परिसरात वारंवार होणाऱ्या अपघातांची गंभीर दखल घेत विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज विभागीय आयुक्त कार्यालयात तातडीची आढावा बैठक घेतली. सदर महामार्गावरील वाहतूक सुरक्षिततेसाठी, नवा रिंगरोड प्रकल्प पूर्ण होईपर्यंत प्रशासकीय यंत्रणेने तत्काळ राबवावयाच्या पाच महत्त्वपूर्ण उपाययोजना घोषीत कराव्यात, अशा ठोस सूचना त्यांनी बैठकीत केल्या.

या बैठकीला जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे विभागीय उपायुक्त तुषार ठोंबरे, पुणे अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, विभागीय उपायुक्त तुषार ठोंबरे, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प अधिकारी संजय कदम, पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिकांचे वरिष्ठ अभियंते, वाहतूक पोलीस, तसेच संबंधित विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत नवले ब्रिज परिसरातील अपघातांच्या पुनरावृत्तीची कारणमीमांसा, वाहतूक कोंडी, ट्रक व भारी वाहनांची अनियंत्रित गती, घाट आणि उतारातील वाहन नियंत्रण यावर सविस्तर चर्चा झाली. अनेक अपघातांमध्ये वाहनांच्या वेगावरील अपुऱ्या नियंत्रणामुळे मोठी जीवितहानी झाल्याचे लक्षात घेऊन उपसभापतींनी पुढील उपाययोजनांचा अवलंब करण्याचे आदेश दिले.

यामध्ये सर्वप्रथम, सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनांचा आधार घेत स्पीड कमी करण्यासाठी सुसंगत रबर स्पीड ब्रेकर किंवा रंबल स्ट्रिप्स बसवण्यावर भर देता येईल. रस्ता ओला असताना वाहनांच्या घसरण्याचे प्रमाण वाढते, त्यामुळे हे स्ट्रिप्स संपूर्ण सुरक्षा मानकांनुसार बसवावेत, अशी स्पष्ट सूचना देण्यात आली.

दुसरे म्हणजे, वाहतूक कोंडी निर्माण झाल्यानंतर तातडीने परिस्थिती हाताळण्यासाठी ction Oriented Plan (OP) तयार करण्याचे निर्देश देण्यात आले. रात्री वा पावसाळ्यात अपघात झाल्यास कोंडी वाढू न देता वाहन प्रवाह सुरळीत ठेवण्यासाठी पोलिस, महामार्ग प्राधिकरण आणि मनपांच्या पथकांमध्ये समन्वय वाढवण्याची गरजही बैठकीत व्यक्त झाली.

तिसरे म्हणजे, अपघातप्रवण झोनमध्ये मोबाइल चेकपोस्ट किंवा स्थिर चौकीची स्थापना करता येईल का याबाबत नियमांनुसार तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले. विशेषतः भारी वाहनांचे वेग नियंत्रण, ब्रेक कंडीशन, ओव्हरलोडिंग यावर नजर ठेवण्यासाठी हे केंद्र प्रभावी ठरतील, असे उपसभापतींनी सांगितले.

चौथ्या उपाययोजनेत अपघातप्रवण परिसरात ध्वनीक्षेपक बसवून चालकांना सतत वेग, उतार, पावसाळी परिस्थिती आणि ट्रॅफिक अद्यतनांची माहिती देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. हे सिस्टम महामार्ग पोलिसांच्या नियंत्रणात राहून त्वरित सूचना देऊ शकतील.

पाचव्या उपाययोजनेत जवळच फायर ब्रिगेडची सुविधा उपलब्ध ठेवणे, रेस्क्यू टीम तैनात करणे, तसेच अपघातानंतर 'गोल्डन अवर'मध्ये मदत पोहोचविण्यासाठी स्वतंत्र पथक तयार करण्याचे निर्देश दिले. याशिवाय ट्रक मालक असोसिएशनची बैठक घेऊन ड्रायव्हर ट्रेनिंग, उतारावरील गतीनियंत्रण, वाहनांची नियमित तपासणी अशा मुद्द्यांवर मार्गदर्शन करण्यासही सांगितले.

बैठकीदरम्यान उपसभापतींनी प्रशासनाला सांगितले की, नवले ब्रिज परिसरातील अपघातांची मालिका थांबवण्यासाठी जबाबदारी निश्चित करून एक आदर्श नमुना तयार करावा.

प्रशासनाने या सर्व उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी करावी, येत्या २६ किंवा २७ डिसेंबर रोजी आपण या संदर्भात आढावा घेणार असल्याचे त्यापूर्वी याबाबीवरचा कार्य अहवाल ठेवावा असे निर्देश दिले.